# प्रियाराणी

सौ.ममताज रहिमतपुरे

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय बा.वा
दा. क्र. 9040



BVBK-0401740
BVBK-0401740

वाच. बा.वा.

# प्रियाराणी ( बाल नाटुकले )

वाचनालय
बा.वा.
१७४०
२२/१२/८८

म. गं. सं. कार्वे, वाचनालय [illegible]
बाल वाङ्मय विभाग
वा. क्र. १७४० दिनांक ......
विषय ... ... क्र. २२/१२/८८

सौ. मुमताज रहिमतपुरे

BVBK-0401740
BVBK-0401740

प्रचार प्रकाशन, कोल्हापूर-४१६ ००८

प्रियाराणी | Priyarani

सौ. मुमताज रहिमतपुरे | Sou. Mumataj Rahimatpure

प्रकाशन क्रमांक ३० | प्रथम आवृत्ती १९८४

प्रकाशक /
सौ. नंदिनी तु. गवळी
५१३ ब, प्लॉट नं. ४ अ, नलवडेमाळ,
प्रतिभानगर पिछाडीस. सागरमाळ,
कोल्हापूर–४१६००८

मुद्रक /
दि. गं. कुलकर्णी
राजहंस प्रिंटींग प्रेस
नागाळा पार्क, कोल्हापूर–४१६००३
फोन : २३९०६

मूल्य / रु. ३ फक्त

© इकबाल कासिम रहिमतपुरे

मुखपृष्ठ / स्टुडिओ मयूर / मधुकर ओतारी

ब्लॉक / उदय प्रोसेस

– प्रमुख वितरक –
मे. सिद्धार्थ बुक सेंटर, गाळा नं. २० प्रतिभानगर मार्केट
सागरमाळ, कोल्हापूर–४१६००८

सूचना– पक्षांची पात्रे त्यांचे मुखवटे वापरून करता येईल.

पात्रे– १) कावळा २) चिमणी ३) मैना ४) पोपट
५) कबूतर ६) मोर ७) कोकीळ आणि ८) प्रियाराणी

## टीप

१) नाटिकेचे सर्व प्रकारचे हक्क लेखिकेचे स्वाधीन.

२) प्रयोगासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक.

म. वा. सं. ठाणे, ग्रंथालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
क्र. ९८७० दिनांक २२/१२/६४
विषय

# प्रियाराणी

---

(वनराई, हिरवळ, हिरवळीवर मैना, पोपट, चिमणी दाणे टिपीत आहेत. इतक्यात कावळा पंखासारखे हात पसरून येतो.)



कावळा – काव् काव् काव्.

चिमणी – चिव, चिवरे काय झाले तुला ओरडायला असे रे!

मैना – क्यांव् क्यांव्. हा मेला सारखा काव् काव् करून डोकं उठवतो.

पोपट–(मान वेळावत नक्कल करतो) डोकं उठवितो.

कावळा – ( रागाने ) काव्. अरे माझं ऐकातरी.

मैना – काय ऐका ?

पोपट – काय ऐका ?

( फडफड आवाज करीत कबुतर यते. घुटूर्रं घूंऽऽ करत गिरक्या मारत रहाते. )

कावळा – काव्. आता कबुतरभाऊ तुम्हीच सांगा. ( सगळे कबुतराभोवती जमतात. )

चिमणी – चिव्. काय रे भाऊ !

मैना – ( घाईने ) काय ? काय रे भाऊ !

पोपट – कायरे भाऊ !

मैना – ( रागाने ) पी ऽ पी ऽऽ काय रे पोपटच्या. मघापासून माझी सारखी नक्कल करतो आहेस नाही का ? आता गप्प बसतोस की चोचीनं तुझी पिसं उपटू ? (अंगावर धावते.)

पोपट – ( पळत ) क्याँऽ व. नक्को, नक्को. मी उगाच गंमत केली.

चिमणी – चिव्. याला नाही तरी एकदा अद्दल घडविली पाहिजे.

कावळा – होय ग चिमणीताई ! पण कबूतरभाऊ तुम्ही काहीतरी सांगणार आहात ना ?

कबूतर – ( अंग फुगवून, गिरकी मारतो ) घुटुर्रं घुं ऽ ऽ होय रे ! पण वेगाने उडत आलो म्हणून जरा दमलो.

चिमणी – चिव् रे. भाऊ लवकर सांग रे !

सगळे – सांग. सांग.

कबूतर – ( गिरक्या मारतो ) मी की नई, आत आत जंगलात गेलो होतो.

सगळे – मग ?

कबूतर – तिथं की नई . . . .

कावळा – काव् काव्. लवकर सांगा ना राव !

पोपट – विठ् विठ्. लवकर सांगा ना राव !

( कावळा डोळे वटारतो. मान वाकडी करून पोपट मजेत हसतो. )

कबूतर – घुटुर्र घूंऽ(गिरकी मारतो) मी की नई...जंगलात गेलो होतो.



मैना – ( ठसक्यात ) क्याँव ! हे मघाचं सांगितलंस तू. पुढं सांग.

कबूतर – (गिरकी मारत)मी आपला लिंबाच्या झाडावर बसलो होतो.

चिमणी –चिव्! यात काय नवीन रे!

मैना – हं ! पुढे सांग.

पोपट – हं ! पुढे सांग.

( मैना रागाने पोपटाला टोची मारते, पोपट विट् विट् करत उडी मारून बाजूला होतो. )

कबूतर – जंगलात अगदी शांऽत होतं.

कावळा – म्हणजे तू तुझी घुटुरं घूं पण बंद केली होतीस ?

कबूतर – (फणकारत अंग फुलविते. जोरात गिरकी घेते.) हो ! पुढे ऐकणार ?

सगळे – हं ! सांग !

कबूतर – तर मला आई ! आई ग ! ! असा आवाज ऐकायला आला.

चिमणी – चिव् चिव् ! म्हणजे माणसाचा !

कबूतर – अहं ! हा आवाज खूप गोड-गोड होता. रडवा होता पण गोड होता.



पोपट – विठ् विठ्! म्हणजे रे कसा?

कबूतर – नाजूक आणि गोड.

मैना – म्हणजे माझ्यासारखा !

कबूतर – अंऽह, झऱ्या च्या खळ-खळाटासारखा नाजूक, मंजूळ.

सगळे – हं ! पुढे !

कबूतर – मी की नई, कानोसा घेतला–कुठून आवाज येतोय, हे शोधू लागलो.

मैना – लागला मग शोध आवाजाचा ?

पोपट – लागला शोध आवाजाचा ?

कावळा – आणि कुठे ?



म. ग. स. छात्र, वाचनालय
बाल मुक्तंद वचाव.
दा. क्र 9680 दिनांक
विषय 22/12/58

कबूतर – ( गिरकी मारतो ) मी या झाडावरून त्या झाडाकडे जाऊ लागलो. कानोसा घेऊ लागलो. एका मोऽठ्या पिंपळाच्या झाडाजवळ आलो.

सगळे – आणि रे !

कबूतर – पिंपळाच्या बुंध्यात एक ढोली होती. आणि त्या ढोलीत – – –

सगळे – ( ओरडत ) कोण होतं त्या ढोलीत ?

कबूतर – ( गिरकी मारून हसतो ) त्या ढोलीत होती आपली प्रियाराणी. डोळे पुसत होती.

मैना – काय ? आपली प्रियाराणी ?

पोपट – आपली प्रियाराणी ?

कावळा – काव् काव् ! पण ती रडत का होती ?

चिमणी – ( कळवळत ) चिव् ! काय झालं आपल्या लाडकीला ?

कबूतर – अरे तो आपला दुष्ट भुंगा – – –

सगळे ( ओरडतात ) त्यानं काय केलं आमच्या लाडक्या प्रियाराणीला, लवकर सांग !

कावळा – ( रागाने उडायची तयारी करतो. ) मी त्या दुष्ट भुंग्याचा आत्ताच फडशा पाडून येतो.

कबूतर – ( त्याला थांबवतो ) थांब रे. मी काय सांगतो ऐक तर. आणि त्या दुष्टाला आता कुठं शोधणार ?

कावळा – सापडेल. रोज तो तळ्यातल्या कमळाला भेटायला जातो. तिथंच असेल तो आता.

कबूतर – हं राहू दे ! मी प्रियाराणीला विचारलं 'प्रियाराणी, प्रियाराणी, रडतेस का तू ? ' ती म्हणाली 'कबूतर भाऊ, माझ्या मागे तो दुष्ट भुंगा लागला. चावायला धावला. मला भीती वाटली. पंख पसरून पडायला लागले. गडबडीत पंखाना, अंगाला बाभळीचे कांटे लागले. आणि . . .

चिमणी – चिव् चिव् ! काय मेला दुष्ट भुंगा तो.



मैना – मेल्याला अद्दल घडवली पाहिजे.

पोपट –(आधी मैनेपासून दूर जातो. मग.) अद्दल घडवली पाहिजे.

( मैना चिडते. पोपट हंसतो. )

कबूतर – प्रियाराणीने भुंग्याला कसंबसं चुकविलं. आणि पिंपळाच्या ढोलीत लपली. दमल्यामुळे तिथंच झोपली झोपून उठली तो तिला खूप भूक लागली होती.

मैना – मग जादूच्या कांडीने नाही का काढायचा !

कबूतर – अरे ! सांगायचं विसरलय की ! अरे प्रियाराणी भुंग्याला घाबरून पळायला लागली ना. तेव्हा गडबडीतून तिच्या हातून ती काठी कुठेतरी पडली.

चिमणी – चिव् रे ! आता काय करायचं ?

मैना – मग भाऊ, तू नाही का ती कांठी शोधून दिलीस!

कबूतर – ( नाराजीने गिरकी घेतो ) मी शोधली ना ! पण कुठे दिसेनाच. सापडेनाच.

सगळे – अस्सं होय ! मग !

कबूतर – मी की नई झटूकन उडालो आंब्याच्या झाडाकडे आलो. आणि छानसे दोन पिकलेले आंबे हेरले. अलगद देठ तोडून चोचीत पकडले. प्रियाराणीला ते आंबे दिले.

चिमणी – बरं केलंस बाबा !

कबूतर – ( आनंदाने गिरकी मारतो ) घुटुरं ऽ घूं ऽऽ प्रियाराणीने आंबे खाल्ले, तिचं पोट भरलं मग ती आनंदाने हसायला लागली.

सगळे – छान् छान.

कबूतर – पण लगेच तिच्या डोळ्यात पाणी आलं.

सगळे – ( काळजीने ) का बरं ?

कबूतर – मी कारण विचारलं. तर म्हणाली, ‘ मला आता आईकडे जायला पाहिजे. पण कशी जाऊ ? ’

कावळा – काव् ! जायचं ! जायचं उडत उडत. त्याला रडायचं कशाला ?

कबूतर – अहं, तिला आपल्या जादूच्या काठीशिवाय घरी जायला येत नाही. आणि ती तर हरवली.

सगळे – आता रे !

कबूतर – मी म्हटलं, ' प्रियाराणी ' घाबरू नकोस. मी माझ्या पक्षीमित्रांना बोलावून आणतो. तुझी जादूची काठी शोधून देतो.

सगळे – बरं झालं तू तसं सांगितलस ते. चल. आम्ही येतो काठी शोधायला.

कबूतर – घुटर्रं घू ऽऽ चला.

( सगळे भुर्रंभुर्रं तोंडाने म्हणत, हात पंखासारखे हालवत गोल गोल फेरी मारतात. मग थांबतात. एका झाडाआडून प्रियाराणी येते. )

सगळे – ( तिला पाहून आनंदाने ) नमस्ते प्रियाराणी !

प्रियाराणी – (आनंदाने) नमस्ते, नमस्ते. (गोड हंसते)

चिमणी –चिव् चिव् तू घाबरू नकोस. आम्ही तुझी जादूची काठी शोधून देतो.

(सगळे जमिनीकडे, आजूबाजूस इकडे तिकडे बारकाईने पहातात. इतक्यात मोर येतो.



त्याच्या चोचीत जादूची काठी असते. त्याला गडबडीत प्रियाराणीचा धक्का बसतो. ती पण काठी शोधत असते. मोराचें चोचीतून काठी पडते.)

मोर – म्याँओ ! अरे रे ! काठी पडली ना !

सगळे – ( गिल्ला करतात. ) कसली काठी ! कसली काठी !

प्रियाराणी – पुढे येते. पडलेली काठी उचलून घेते ही तर माझीच जादूची काठी.

मोर – प्रियाराणी, तुझी काठी ? मग बरं झालं मला सापडली ते !

प्रियाराणी – होय रे ! आणखी तू इकडे आलास तेही बरे झाले ! माझी घरी जायची पंचाईत झाली होती !

चिमणी – चिव् ! छान केलस मोरदादा !

प्रियाराणी–तुम्ही सारे माझे किती गोड मित्र आहात रे ! तुमची मला किती मदत झाली. आता मी जाते. आईच्या कुशीत केव्हां शिरेन असं झालंय मला.

कबूतर – ( गिरकी मारत ) जरा थांब ना प्रियाराणी. आपण थोडी मौज करू.

चिमणी – मोरदादा, तू आपला नाच दाखव. आम्ही फेर धरतो.

मोर – गाणे कोण म्हणणार पण !

मैना – पीऽऽ तुला कुठे नाच-ताना गाणं लागतं !



मोर – (लाजत) तसं नव्हे ग मैनाताई. पण मंजुळ गाणं ऐकूण प्रियाराणीला आ नं द नाही का व्हायचा ?

कावळा – मग बोलवा कोकिळला !

पोपट – कुठं आहे तो ?

मैना – तो पहा आंब्यांच्या झाडाआड लपलाय.

कावळा – (काव् काव् करत त्याच्यापाशी जातो. कोकिळ आपला पळत येतो )

पोपट – गाणं. गाणं म्हण. कोकिळ !

मैना – आपल्या प्रियाराणीसाठी म्हणायचं !

कोकिळ – (लाजत) कुहू कुहू. म्हणतो हं (प्रियाराणीसह सगळे फेर धरतात. मोर नाचू लागतो.)

कोकिळ ( गाणू म्हणू लागतो )

कुहू कुहू कुहू
जंगल लागे दुमदुमू
कुहू कुहू कुहू
मोर लागे नाचू
चिमणी, पोपट, मैना
कुहू कुहू कुहू
कावळा आणि कबूतर
कुहू कुहू कुहू
फेर धरला गोल गोल
कुहू कुहू कुहू
प्रियाराणी लागे हसू डोलू

( प्रियाराणी आनंदाने हसते. जादूची काठी हाती घेऊन हात पसरून उडल्यासारखे करते. जाताना टाटा करते. सारे तिच्या पाठोपाठ भुर्रं भुर्रं भुर्रं उडत जातात. हात पसरून )

☐ ☐

म. वं. नं. ठाणे, वाचनालय ठाणे.
बाल वाङ्मय विभाग.
दा. क्र. ९६८० दिनांक २२।१२।५८
विषय ......
BVBK-0401740
BVBK-0401740